# माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास

**सचिन सुरेश पवार**

*एस.एस.पी.एम. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, टेहू, ता. पारोळा, जित्र धुळे.*

***सारांश :***

*प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 वीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास केला आहे. वर्णनात्मक संशोधन पदधतीतील सर्वेक्षण व सहसंबंधात्मक संशोधन पदधतीचा अवलंब केला होता. एकूण 200 विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पदधतीने निवड करण्यात आली होती. माहितीचे संकलन करण्यासाठी डॉ. टी. प्रदिपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा तसेच विद्यार्थ्यांची अध्ययनशैली मापन करण्यासाठी मुमफोर्ड आणि हनी यांची रुपांतरीत अध्ययनशैली शोधिकेचा अवलंब केला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसनचा 'r' सहसंबंध गुणकाचा वापर करण्यात आला होता. प्रस्तुत संशोधनातून माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीशी धन सहसंबंध आहे असे दिसून येते.*

**प्रस्तावना:** माध्यमिक स्तरावरील शिक्षणातून विद्यार्थ्यांची आकलन शक्तीची परीक्षण होणे गरजेचे असते. भविष्यात या आकलन शक्तीवरच विद्यार्थी आपले करिअर घडवित असतात. माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवरच त्यांची कुशलता अवंलबून असल्यामुळे विद्यार्थ्यांना दिलेला अभ्यास चांगल्या पदधतीने समजला पाहिजे हे महत्त्वाचे आहे. भाषा विषय असो, सामाजिक शास्त्र असो वा विज्ञानासारखे विषय असो विद्यार्थ्यांना या विषयातील गाभा समजून घेण्यासाठी शिक्षक सर्वस्वी प्रयत्न करतातच परंतु स्वतः विद्यार्थ्यांलाही विषय समजून घेण्यासाठी आभ्यास सवयी व अध्ययनशैली विकसित करणे गरजेचे असते.

घरातील वातावरण, स्वतःची मानसिक स्थिती यानुसार अभ्यास सवयी विद्यार्थ्यांनी आपोआपच निर्माण केलेल्या असतात. यातील चांगल्या आणि वाईट अभ्याससवयी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर प्रभाव पाडीत असतात. काही विद्यार्थी शांततेत अभ्यास करण्यासाठी प्रयत्न करतात तर काहींना तोच अभ्यास गटात करण्याची इच्छा असते. वर्गात नोटस काढणे, घरी गेल्यावर ते परत लिहिणे अशा अनेक युक्त्या विद्यार्थ्यांनी ठरविलेल्या असतात. म्हणूनच अभ्यास सवयीयाकडे लक्ष दिले गेले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे योग्य वेळेचे नियोजन, स्वयंशिस्त, स्मरण, संघटन आणि प्रयत्न यांचा समन्वय चांगल्या अभ्यास सवयी तयार करीत असतात. अभ्यास बरोबरच अध्ययनशैली हा एक महत्त्वाचा मुद्या मानला जातो. शैक्षणिक मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केला तर आपल्याला लक्षात येते की, व्यक्ती तितक्या प्रवृत्ती किंवा व्यक्तीभेद असल्यामुळे

विद्यार्थी एकमेकांपासून वेगळे असतात. त्यांची विचार करण्याची शैलीही वेगळी असते. याचा प्रभाव त्यांच्या अध्ययनशैलीवर पडत असतो. ऐकणे, समजून घेणे, पाहणे त्यावर विचार करणे, पाहून लिहिणे व ते स्मरणात ठेवणे हे अध्ययनशैली मजबूत करीत असतात. परंतु विद्यार्थी त्याच्या क्षमतेनूसार आपल्याला आकलन योग्या प्रकारे कसे होणार याचा विचार करुनच अध्ययन करीत असतो. म्हणूनच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक संपादणूकीवरही अध्ययनशैलीचा प्रचंड प्रभाव पडतो.

अभ्यास सवयी आणि अध्ययनशैली ही विद्यार्थ्यांच्या बाबतीत महत्त्वाची मानली जाते. प्राथमिक स्तरापासून तर उच्चशिक्षण स्तरावर या दोघी महत्त्वाच्या आहेत. ज्याच्या चांगल्या अभ्यास सवयी व चांगली अध्ययनशैली विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे गमक असतात. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 वीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास केला आहे.

### समस्या विधान

1. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीचा शैक्षणिक संपादणूकीशी सार्थ सहसंबंध आहे का?
2. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीचा शैक्षणिक संपादणूकीशी सार्थ सहसंबंध आहे का?
3. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींच्या अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीचा शैक्षणिक संपादणूकीशी सार्थ सहसंबंध आहे का?

### उद्दिष्टये

1. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीचा शैक्षणिक संपादणूकीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
2. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीचा ष्शैक्षणिक संपादणूकीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
3. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींच्या अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीचा ष्शैक्षणिक संपादणूकीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

### परिकल्पना

1. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
2. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
3. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

4. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
5. माध्यमिक माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची (मुले) अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
6. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीची अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

**संशोधन पदधती:** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक आणि अभ्यास सवयी यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण आणि सहसंबंधात्मक संशोधन पदधतीचा अवलंब केला होता.

**जनसंख्या:** प्रस्तुत संशोधनात शिरपूर शहारातील माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 वीच्या वर्गात अध्ययन करणारे सर्व मुली व मुलांची जनसख्यां म्हणून निष्चिती करण्यात आली होती.

**न्यादर्श:** प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 वीच्या एकूण 200 विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पदधतीने निवड करण्यात आली होती.

**साधने:** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची अभ्यास सवयीचे मापन करण्यासाठी डॉ. टी. प्रदिपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा अवलंब केला होता. या मापिकेत एकूण 30 विधाने आहेत. तसेच विद्यार्थ्यांची अध्ययनशैली मापन करण्यासाठी मुमफोर्ड आणि हनी यांची रुपांतरीत अध्ययनशैली शोधिकेचा अवलंब केला होता. या शोधिकेत एकूण 80 विधाने आहेत. (ही शोधिका डॉ. संजीवनी महाले यांच्या अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययनशैली–इनसाईट प्रकाशन, नाशिक या पुस्तकातून घेतली आहे.) विद्यार्थ्यांना सहामाही परीक्षेत मिळालेले गुणांकाचा उपयोग शैक्षणिक संपादणूकीसाठी केला होता.

**संख्याशास्त्रीय परिमाणे:** प्रस्तुत संशोधन संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसनचा 'r' सहसंबंध गुणकाचा वापर करण्यात आला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:** माध्यमिक शाळेतील इयत्ता 9 वीच्या विद्यार्थ्यांना अभ्यास सवयी आणि अध्ययनशैली या चाचण्या देण्यात आलेल्या होत्या या चाचण्यांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरुन पुढील प्रमाणे परिकल्पना परिक्षण करण्यात आल्या होत्या.

**परिकल्पना परिक्षण**

**1. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| माध्यमिक शाळेतील विद्यार्थी | संख्या N | टेबल 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | सहसंबंध | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|
| अभ्यास सवयी<br>शैक्षणिक संपादणूक | 200 | .139 | .758 | उत्तम प्रतीचा | त्याग |

स्वाधीनता मात्राा 198 साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य .139 आहे व प्राप्त 'r' मूल्य .758 असून ते नमूना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरुन असे म्हणता येईल की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो उत्तमप्रतीचा सहसंबंध आहे.

**2. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| माध्यमिक शाळेतील विद्यार्थी (मुले) | संख्या N | टेबल 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | सहसंबंध | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|
| अभ्यास सवयी<br>शैक्षणिक संपादणूक | 100 | .139 | .658 | मध्यम प्रतीचा | त्याग |

स्वाधीनता मात्रा 98 साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य .196 आहे व प्राप्त 'r' मूल्य .658 असून ते नमूना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरुन असे म्हणता येईल की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम मप्रतीचा सहसंबंध आहे.

**3. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या | संख्या N | टेबल 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | सहसंबंध | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|
| अभ्यास सवयी<br>शैक्षणिक संपादणूक | 100 | .139 | .691 | मध्यम प्रतीचा | त्याग |

स्वाधीनता मात्रा 98 साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य .196 आहे व प्राप्त 'r' मूल्य .691 असून ते नमूना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरुन असे म्हणता येईल की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम मप्रतीचा सहसंबंध आहे.

**4. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| माध्यमिक शाळेतील विद्यार्थी | संख्या N | टेबल 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | सहसंबंध | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|
| अध्ययनशैली<br>शैक्षणिक संपादणूक | 200 | .139 | .744 | उत्तम प्रतीचा | त्याग |

स्वाधीनतता मात्राा 198 साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य .139 आहे व प्राप्त 'r' मूल्य .744 असून ते नमूना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरुन असे म्हणता येईल की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो उत्तमप्रतीचा सहसंबंध आहे.

**5. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| माध्यमिक शाळेतील विद्यार्थी (मुले) | संख्या N | टेबल 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | सहसंबंध | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|
| अध्ययनशैली<br>शैक्षणिक संपादणूक | 100 | .139 | .687 | मध्यम प्रतीचा | त्याग |

स्वाधीनतता मात्रा 98 साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य .196 आहे व प्राप्त 'r' मूल्य .687 असून ते नमूना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरुन असे म्हणता येईल की, माध्यमिक

शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम मप्रतीचा सहसंबंध आहे.

**6. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या | संख्या N | टेबल 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | सहसंबंध | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|
| अध्ययनशैली | 100 | .139 | .678 | मध्यम प्रतीचा | त्याग |
| शैक्षणिक संपादणूक | | | | | |

स्वाधीनता मात्रा 98 साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 'r' मूल्य .196 आहे व प्राप्त 'r' मूल्य. 678 असून ते नमूना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरुन असे म्हणता येईल की, माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम मप्रतीचा सहसंबंध आहे.

**निष्कर्ष**

1. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो उत्तम प्रतीचा सहसंबंध आहे.
2. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम प्रतीचा सहसंबंध आहे.
3. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अभ्यास सवयी आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम प्रतीचा सहसंबंध आहे.
4. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो उत्तम प्रतीचा सहसंबंध आहे.
5. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मुले) अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम प्रतीचा सहसंबंध आहे.
6. माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीच्या अध्ययनशैली आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यात धनसहसंबंध असून तो मध्यम प्रतीचा सहसंबंध आहे.

**चर्चा** : प्रस्तुत संशोधनाचे वरील निष्कर्ष पाहता लक्षात येते की, अभ्यास सवयी आणि अध्ययनशैलीचा विद्यार्थ्यांचा शैक्षणिक संपादणूकीशी धनसहसंबंध आहे. म्हणूनच शाळेत आणि

त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कुटूंबातूनही अभ्यास सवयी आणि अध्ययनशैली चांगल्या पदधतीने विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पालकांनीही मुलांच्या अभ्यासबाबत वेळ, घरातील वातावरण आणि नियोजन याकडे लक्ष दिल्यास त्यांच्या अध्ययनशैली विकसित होवून त्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर होवू शकतो. विद्यार्थ्यांनीही आपली अध्ययनशैली कशी चांगल्याप्रकारे विकसित होवू शकते याकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्याला चांगल्याप्रकारे कसे आकलन होवू शकेल अशी स्वतःची अभ्यास सवयी ही विकसित केली पाहिजे.

## संदर्भसूची

दुनाखे, अरविंद (2005). शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणेः नित्य नूतन प्रकाशन.

भिंताडे, वि.रा. (1989). शैक्षणिक संशोधन पदधती (प्रथम आवृत्ती). पुणेः नुतन प्रकाशन.

कदम, चा. प. (1997). शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणेः विद्या प्रकाशन.

घोरमोडे व घोरमोडे. (2010). शैक्षणिक व मार्गदर्शन आणि समुपदेशन. नागपूरः विद्या प्रकाशन.

म्हाले, संजीवनी (2008). अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययनशैली. नाशिकः इनसाईट प्रकाशन.

Aggarwal, J.C. (1991). Educational & Vocational Guidance & Counseling. New Delhi: Doaba House.

Best, J.W. (1986). Research in Education, New Delhi: Prentice Hall of India Pvt. Ltd

Chauhan, S.S. (1999). Advanced Educational Psychology, New Delhi: Vikas Publishing House.